# Newspaper: Janadesh

## Date: 8/7/2025

## News highlighting the achievement of Podarite Shardul Vichare ranked AIR Third in CA Foundation exam


ठाणे
रायगड
पालघर

झुंजार पत्रकारांचं झुंजार दैनिक
✲Email : janadesh99@gmail.com

# जनादेश

विशाल जागृत

दैनिक जनादेश
आता दररोज ई-पेपर
स्वरुपात पाहता येईल...
https://janadesh.co
या वेब लिंकवर
क्लीक करा

✲वर्ष: २२ ✲अंक: २४४ ✲मंगळवार ८ जुलै २०२५ ✲संपादक : कैलाश म्हापदी ✲कार्यकारी संपादक : जयदास मोरे


## शार्दूल विचारे याची ‘सीए फाउंडेशन’ परीक्षेत अखिल भारतीय तृतीय क्रमांकाने घवघवीत कामगिरी

### पोयनार–रत्नागिरीच्या मातीतून जन्मलेला बुद्धिमत्तेचा उजवा दीप

दिनकर भुजबळ

रायगड, दि. ७ : नम्र अभिमानाने सांगाव वाटते की, डोंबिवलीतील शार्दूल शेखर विचारे या गुणवंत विद्यार्थ्याने मे २०२५ मध्ये झालेल्या ‘सीए फाउंडेशन’ परीक्षेत अखिल भारतीय तृतीय क्रमांक (AIR 3) पटकावून आपल्या बुद्धिमत्तेचा आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा झळाळता ठसा देशपातळीवर उमटवला आहे.



शार्दूल याची शैक्षणिक वाटचाल नेहमीच उल्लेखनीय राहिली आहे. त्याने १०वी ICSE बोर्ड परीक्षेत ९९.६०% गुणांसह AIR 3 मिळवून ओंकार इंटरनॅशनल स्कूल, डोंबिवलीचे नाव उज्वल केले. त्यानंतर मार्च २०२५ मध्ये आर. ए. पोदार कॉलेज, माटुंगा येथून १२वीच्या HSC परीक्षेत ९५.१७% गुणांची उत्तम कामगिरी केली.

शार्दूलचे वडील शेखर विचारे यांचे मूळ गाव पोयनार, ता. खेड, जि. रत्नागिरी असून, मातृकुळ वडगाव (जि. सातारा) हे जयराम स्वामींचे पावन स्थळ आहे. या भूमीतून जन्मलेल्या शार्दूलने आपल्या यशाने वडगावकर व पोयनारकर मंडळींनाही अभिमानाची झळाळी दिली आहे. त्याच्या घवघवीत यशाचे आम्ही वडगावकर मंडळी कडून विशेष अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

या यशामागे शार्दूलचा सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध दिनक्रम, आणि पालकांची मोलाची साथ हे सर्वांत मोठे घटक आहेत.

मोठं स्वप्न पाहण्याची जिद्द आणि त्यासाठी मेहनतीची तयारी असेल, तर यश नक्कीच मिळतं. डोंबिवली एमआयडीसी परिसरातील कासाब्लँका सोसायटीत राहणाऱ्या शार्दुल शेखर विचारे या डोंबिवलीकर तरुणाने सिद्ध केलं आहे..... आमदार रवींद्र चव्हाण

शार्दूलला मनःपूर्वक अभिनंदन आणि उज्वल भविष्यासाठी अनंत शुभेच्छा! –पालक: सीमा व शेखर विचारे, डोंबिवली, मुंबई.